उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्र. ४,५ व ६ अंतर्गत येणा-या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात पावसाळयाच्या दिवसात आपत्तकालीन व्यवस्थापनाकरिता तसेच दुभाजकातील जंगली गवत काढणे व इतर साफसफाई करणेकामी ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेकामी निविदेतील व करारनाम्यातील अटीशर्तीप्रमाणे आपणास खालीलप्रमाणे वाढीव मजुर पुरवठा करण्यास कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजुर दर | मजुर संख्या |
|---|---|---|---|
| 1. | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात ठेका पध्दतीने (मजुर, स्त्री/पुरूष) पुरवठा करणे. | रू. 863/- प्रति दिन, प्रति मजुर | 20 मजुर |

टीप:- सदर मजुर पुरवठा करण्याची मुदत दि. 30/06/2016 पासुन ते 31/10/2016 पर्यंत राहील.

29/6/16

कार्यकारी अभियंता (सा.बां.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

दूरध्वनी: २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स: २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा. नं. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/१५८/२०१६-१७

दिनांक : १५/६/२०१६

## // कार्यादेश //

प्रति,
मे. स्टार कंन्ट्रक्शन
भाईंदर शॉपंग सेंटर,
फाटक रोड़, भाईंदर (प.)

**विषय :- उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग प्रभाग क्र. ४, ५ व ६ करिता ठेका पध्दतीने भजुर पुरवठा करणेबाबत.**

संदर्भ :- 1) मा. वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र. 12 दि. 23/05/2013 अन्वये.
2) दि. 24/01/2014 रोजी दै. नवभारत व दै. मिडे या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग वेबसाईट https://mbmc.eproc.in वर प्रसिध्द केलेली जाहीर फेर निविदा (व्दितीय)सूचना.
3) मा. निविदा समिती यांची दि. 24/02/2014 रोजी निविदा स्विकारणेस शिफारस.
4) मा. आयुक्त सो. यांची दि. 24/02/2014 रोजीची निविदेस मंजुरी.
5) मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 10 दि.30/05/2014 अन्वये निविदेस मान्यता.
6) आपल्या सोबत केलेला दि.31/05/2014 रोजीचा करारनामा.
7) मा.महासभा ठराव क्र.138 दि.24/02/2016
8) मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली दि.03/03/2016 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत.
9) मा.आयुक्त सो.,यांची दि. 09/03/2016 रोजीची मंजुरी.
10) मा.आयुक्त सो. यांचा जा. क्रं. मनपा/वृप्रा/700/2015-16 दि. 31/03/2016 अन्वये सुधारित कार्यादेश.
11) मा.आयुक्त सो.,यांची दि. 15/06/2016 रोजीची मंजुरी.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्र. 4, 5 व 6 अंतर्गत येणा-या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात पावसाळयाच्या दिवसात आपत्तकालीन व्यवस्थापनाकरिता तसेच दुभाजकातील जंगली गवत काढणे व इतर साफसफाई करणेकामी ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेकामी निविदेतील व करारनाम्यातील अटीशर्तीप्रमाणे आपणास खालीलप्रमाणे वाढीव मजुर पुरवठा करण्यास कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजुर दर | संख्या |
|---|---|---|---|
| 1. | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात ठेका पध्दतीने (मजुर, स्त्री/पुरुष) पुरवठा करणे. | रु. 863/- प्रती दिन, प्रती मजुर | 20 मजुर |

टिप:- सदर मजुर पुरवठा करण्याची मुदत दि. 15/06/2016 पासून ते 31/10/2016 पर्यंत राहील.

कार्यकारी अभियंता (साबां)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत
उप मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. 4, 5 व 6
मिरा भाईंदर महानगरपालिका

ठेकेदाराचे नांव :- मे. हिरावती इंटरप्रायजेस,
आर.आर. यादव कंपाऊंड, महाकाली रोड,
अंधेरी पुर्व, मुंबई — ४०० ०९३

कामाचे नांव :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागा करीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे. (१ वर्षाकरीता)

सत्यप्रत

उप.मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. 4, 5 व 6
मिरा भाईंदर महानगरपालिका

## CHALLAN
### MTR Form Number-6

| | | | |
|---|---|---|---|
| ...l MH008141031202122E | BARCODE | Date 28/10/2021-13:11:39 | Form ID |

| | | | |
|---|---|---|---|
| ...partment | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| | Non-Judicial Stamps | TAX ID / TAN (If Any) | |
| ...pe of Payment | Non-Judicial Stamps | PAN No.(If Applicable) | AAXPY7712Q |
| ...fice Name | GENERAL STAMP OFFICE MUMBAI | Full Name | HIRAVATI ENTERPRISES |
| ...ocation | MUMBAI | | |
| ...ear | 2021-2022 One Time | Flat/Block No. | RR YADAV COMPOUND |

| Account Head Details | Amount In Rs. | | |
|---|---|---|---|
| | | Premises/Building | |
| ...0030052601 Amount of Tax | 50000.00 | Road/Street | SHERE PUNJAB MC RD ANDHERI |
| | | Area/Locality | MUMBAI |
| | | Town/City/District | |
| | | PIN | 4 0 0 0 9 3 |
| | | Remarks (If Any) | |
| | | STAMP DUTY ON MAINTENANCE N CARE TAKER OF TREES PLANTED UNDER TREE AUTHORITY MBMC | |
| | | Amount In Words | Fifty Thousand Rupees Only |
| Total | 50,000.00 | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Payment Details | IDBI BANK | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 69103332021102816076 | 2710185174 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 28/10/2021-13:13:06 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | IDBI BANK | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Mobile No. : 9867336543

Department ID :

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तासाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तासाठी सदर चलन लागु नाही.

सत्यप्रत

उप.मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. 4, 5 व 6
मिरा भाईंदर महानगरपालिका



Print Date 28-10-2021 01:13:23

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93.

# // करारनामा //

हा करारनामा दिनांक /१०/२०२१ रोजी करण्यात येत आहे.. हा करारनामा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रस्थापित मिरा भाईदर महानगरपालिकेच्या वतीने **उप. आयुक्त (उद्यान), श्री. संजय शिंदे, पत्ता – मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईदर (प.), जि. ठाणे.** यांचेमार्फत त्यांच्या पुढील म्हणजेच या प्रकरणी प्रथम पक्षीय (संदर्भाखेरीज इतरत्र उल्लेख केल्याशिवाय) म्हणून उल्लेख केला जाईल आणि मे. हिरावती इंटरप्रायजेस यांच्यावतीने त्यांचे प्रोप्रायटर श्री. सुशांत तिर्थराज यादव. पत्ता – आर.आर. यादव कंपाऊंड, महाकाली रोड,अंधेरी पुर्व, मुंबई – ४०० ०९३ यांना व्दितीय पक्षीय म्हणून संबोधण्यात येईल, यांच्यामध्ये करारनामा होत आहे.

ज्याअर्थी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ अन्वये प्रस्थापित झालेली मिरा भाईदर महानगरपालिका ही प्रथम पक्षीय असून मे. हिरावती इंटरप्रायजेस. हे व्दितीय पक्षीय आहेत. ज्याअर्थी मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे(कालावधी १ वर्ष)आवश्यक आहे.

त्याअर्थी मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाली करीता मजुर पुरवठा करणेकामी मा. महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यते नुसार व मा. आयुक्त यांच्या दि. ०५/०५/२०२१ रोजीच्या मान्यतेने मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करीता मजुर पुरवठा करणेकामी ई-टेंडरिंग ऑनलाईन पध्दतीने दि.०७/०५/२०२१ रोजी दै. ठाणे वैभव व दै. द ग्लोबल टाईम्स या वृत्तपत्रात जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

सदर कालावधीत ०५ निविदा प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त ०५ निविदाधारकांची Technical Bid दि.२५/०५/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे. तसेच मा. निविदा समिती समोर कागदपत्रांची पडताळणी करुन पात्र ०२ निविदाधारकांची दि.०२/०८/२०२१ रोजी Financial Bid उघडण्यात आलेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | निविदाधारकाचे नाव | सादर केलेले दर | दर वाटाघाटीनंर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे(कालावधी १ वर्ष) (वृक्षांची निगा व देखभाली करीता लागणाऱ्या साहित्यासह) | मे. हिरावती इंटरप्रायजेस | Rs. १२९६/- प्रति दिन/प्रति मजूर | Rs. ११६०/- प्रति दिन/प्रति मजूर |
| | | मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस | Rs. १४८५/- प्रति दिन / प्रति मजूर | |

करीता लागणाऱ्या साहित्यासह) निविदाधारकांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटीअंती वरील प्रमाणे दर
उपरोक्त प्रमाणे निविदा दर सुचीमध्ये L१ निविदाधारकांनी सादर केलेल्या दरामध्ये वाटाघाटीअंती वरील प्रमाणे दर
उपरोक्त प्रमाणे निविदा दर सुचीमध्ये L१ आलेली कमी दराची निविदा स्विकारण्यास मा.निविदा
कमी केलेले असून मे. हिरावती इंटरप्रायजेस यांची वाटाघाटीअंती आलेली कमी दराची निविदा स्विकारण्यास मा.निविदा
समितीने दि.१७/०८/२०२१ रोजी शिफारस केलेली असून त्यास मा. आयुक्त यांनी दि. ०३/०९/२०२१ रोजी मान्यता दिलेली
असून सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात वृक्ष प्राधिकरण विभागाअंतर्गत <u>"मजुर पुरवठा/निगा व देखभाल"</u> या
लेखाशिर्षाखाली रु. १००.०० लाख (रु.एक कोटी मात्र) व उद्यान विभाग अंतर्गत <u>"मजुर पुरवठा"</u> या लेखाशिर्षाखाली
रु.९००.०० लाख (रु. नऊ कोटी मात्र) ची तरतूद करण्यात आलेली असून सदर कामाकरिता अंदाजे रु.३५०.०० लाख
(रु.तीन लाख कोटी पंन्नास लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे. सदर कमी दराची मे. हिरावती इंटरप्रायजेस यांच्या वार्षिक
निविदेस प्रशासनाने सादर केलेल्या गोषवाऱ्यानुसार मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ८४ दि. २९/०९/२०२१ अन्वये मान्यता
देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे उप. आयुक्त यांच्या स्वाक्षरीने स्वीकृती पत्र देणे, करारनामा करुन कार्यादेश देणेकामी
मा.आयुक्त सो. यांनी दि. १२/१०/२०२१ रोजी मान्यता दिली आहे.

सदर निविदेची प्रत Annexure No. "A" म्हणून संबोधण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय हे मे. हिरावती इंटरप्रायजेस या नावाने व्यवसाय करीत आहेत आणि ज्याअर्थी व्दितीय पक्षीय यांनी सदर कामाबाबत संमती दर्शविलेली आहे.

आणि ज्याअर्थी अटी व शर्तीनूसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये या कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीयांना बंधनकारक आहेत.

**या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत**

१. मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे कामासाठी निविदा पुस्तिकेतील, गोषवाऱ्यामधील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याचे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे.

२. सदरकामी लागणारा आवश्यक तो तांत्रिक व क्षेत्रीय कर्मचारी वर्ग यांची व्यवस्था स्वत:च करावी लागेल.

३. महानगरपालिकेमार्फत सदर कामाकरीता कोणत्याही प्रकारची मशीनरी, वाहन अथवा तांत्रिक कर्मचारी पुरविण्यात येणार नाही.

४. किमान वेतन कायदा १९४८ च्या नियमानुसार ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना वेतन विमा, प्रोव्हिडंट फंड, बोनस, रजा व इतर सवलती इत्यादी बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील. प्रथम पक्ष याकरीता कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. त्याच प्रमाणे या बाबतच्या संदर्भातील नियमावलीनुसार आवश्यक त्या नोंदवह्या व नोंदी अद्यावत ठेवणे व्दितीय पक्षास बंधनकारक आहे.

५. कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्ट १९७० व १९७१ अन्वये कंत्राटी मजुरांचा गटविमा, इ.एस.आय.सी. प्रोविडंट फंड, मेडिक्लेम, बोनस इ. इ. भत्ते कामगारांना देणे बंधनकारक आहे. प्रत्येक महिन्यात कंत्राटी कामगारांचे पी.एफ. ची रक्कम कामगारांच्या वैयक्तिक खात्यावर जमा करणे हे शासकीय नियमानुसार बंधनकारक असुन व्दितीय पक्ष यांनी सदर पी.एफ. ची रक्कम जमा केल्याबाबतची प्रत देयका सोबत जोडणे व्दितीय पक्षास बंधनकारक आहे. अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

६. व्दितीय पक्षीयांनी कंत्राट पध्दतीने कामे करताना प्रचलित शासनाचे नियम, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परीपत्रक, आदेश, सुचना, महानगरपालिकेचे आदेश, परीपत्रक, सुचना, ठराव यांचे पालन / अमलबजावणी करणे व तसेच वरील कामी आवश्यक ते सर्व परवाने संबंधीत कार्यालयाकडुन घेणे व्दितीय पक्षास बंधनकारक राहील.

७. बाल मजुर कायद्याचे पालन करणे व्दितीय पक्षास बंधनकारक राहील.

८. शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार किंवा महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या नियमांची पुर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी व्दितीय पक्षाची राहिल.

९. कंत्राटी कामगार नियम १९७१ च्या नियम ५५ नुसार रजिस्टर तयार करावयाचे असल्यामुळे नमुना क्र. VIII मध्ये नमुद केलेल्या तपशीलाची सर्व अचुक माहिती प्रथम पक्ष यांना वेळोवेळी पुरविण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

१०. दररोज ठरवून दिलेल्या कामाच्या वेळेत कामाच्या ठिकाणी स्वखर्चाने मजुर आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील तसेच ठेका मजुर दैनंदिन हजेरी बाबतची नोंद नोंदवही मध्ये ठेवून त्यावर संबंधीत प्र.उप. मुख्य उद्यान अधिक्षक यांच्या स्वाक्षरीनिशी उप-आयुक्त तथा वृक्ष अधिकारी यांचेकडे सादर करणे व्दितीय पक्षास बंधनकारक राहिल.

११. अ) किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत वाढीव विशेष भत्याची (D.A.) रक्कम देणे बंधनकारक असल्याने, वेळोवेळी होणाऱ्या बदला नुसार विशेष भत्यामध्ये (D.A.) होणाऱ्या वाढीनुसार रक्कम मनपाकडुन ठेकेदारास अदा केली जाईल व सदरच्या वाढीव दरानुसार किमान वेतन सर्व कर्मचारी यांना अदा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

ब) किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत किमान वेतनामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार वाढीव रक्कम मनपाकडुन ठेकेदारास अदा केली जाईल.

१२. सदर मजुर स्त्री/पुरुष हे महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार कमी जास्त प्रमाणात मनपा निर्देश देईल त्या प्रमाणात पुरवठा करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीयांची राहील.

१३. कंत्राटाच्या कालावधी व्दितीय पक्ष यांनी मजुरांचा पुरवठा खंडीत केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन ठेका रद्द करण्यात येईल.

१४. एखादा मजुर काम सोडुन गेल्यानंतर तात्काळ नविन मजुर पुरवठा करण्याचे व्दितीय पक्ष यांनी मान्य केले आहे.

१५. व्दितीय पक्ष यांनी काम समाधानकारक केल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभागाचे प्र. उप. मुख्य उद्यान अधिक्षक यांच्याकडुन प्रमाणित करुन सादर केल्याशिवाय देयक अदा करण्यात येणार नाही.

१६. महानगरपालिकेल्या आवश्यतेनुसार वृक्ष प्राधिकरण विभागाचे प्र. उप. मुख्य उद्यान अधिक्षक व वरीष्ठ यांच्या आदेशानुसार सर्व कामे करण्याची जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील.

१७. व्दितीय पक्ष यांनी प्रत्ये महिन्यास कामगारांना वेळच्या वेळी किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा (प्रत्येक महिन्याच्या तारखेच्या आतमध्ये) करणे बंधनकारक राहील.

१८. प्रत्येक कामगारांना साप्ताहिक सुट्टी देणे, नेमलेल्या कामगारांना रजा व इतर सवलती इत्यादी बाबींची पुर्तता करण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील. याबाबत प्रथम पक्षाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. तसेच ठेका मजुरांचे (स्त्री/पुरुष) काम दररोज दोन शिफ्ट मध्ये आणि [illegible]

सत्यप्रत

लागणार असल्याने त्याप्रमाणे तीनही शिफ्ट करीता ठेका मजुर (स्त्री/पुरुष) पुरवठा करणे बंधनकारक आहे. तसेच साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी बदली कर्मचारी देण्याची जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील.

१९. व्दितीय पक्षाच्या कामाबाबत अनियमितता, तक्रारी तसेच काम समाधानकारक न आढळल्यास सात दिवसाची लेखी नोटीस देऊन सदरचा ठेका रद्द करण्यात येईल असे व्दितीय पक्ष यांनी मान्य केले आहे.

२०. कंत्राटी कामगार कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख (उदा. हजेरी नोंदवही, वेतन वाटप नोंदवही, दैनंदिन कामाच्या नोंदवही व इतर आवश्यक नोंदवह्या इ.) ठेवणे व सदर नोंदवह्या संबंधित उद्यान अधिक्षक यांचेकडुन दर महिन्यास तपासणी करणे व्दितीय पक्षास बंधनकारक आहे.

२१. व्दितीय पक्षात व कामगारामध्ये कोणताही तंटा/वाद निर्माण झाल्यास महानगरपालिका हस्तक्षेप करणार नाही.

२२. व्दितीय पक्ष यांनी प्रत्येक मजुराला कॉन्ट्रेक्ट लेबर अॅक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्रे देणे बंधनकारक असुन कामगारांचे ओळखपत्र स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे व कामाच्या दिवशी सदर ओळखपत्र मजुरांकडे असल्याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीयांची राहील.

२३. मंजुर दराप्रमाणे मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मजुर पुरवठा आवश्यकतेनुसार कमी अगर जास्त करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

२४. सदर कामाची संपुर्ण पुर्तता निविदेतील व करारनाम्यामधील अटीशर्तीनुसार करण्याची संपुर्ण जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील. यात हयगय झाल्यास व त्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान व त्यांचे भरपाईस् व्दितीय पक्ष जबाबदार राहतील.

२५. ठेका मजुर कामगारांना गणवेश देऊन त्यावर कंपनीचे नाव लिहिण्याची जबाबदारी व्दितीय पक्षाची राहील.

२६. मजुरांना सुरक्षा विषयक साहित्य उदा. ग्लोज, गमबुट, रेनकोट इ. देण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

२७. वृक्ष प्राधिकरण विभागाअंतर्गत तसेच महानगरपालिका सांगेल अशी सर्व कामे मजुरांना करावी लागतील. तसे न केल्यास व्दितीय पक्षास सात दिवसांची लेखी नोटीस देऊन दंडात्मक कार्यवाही करुन सुरक्षा अनामत बँक गॅरेन्टी जप्त करुन निविदा रद्द करण्यात येईल.

२८. वृक्षांची निगा व देखभाल करणे कामाव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार महानगरपालिकेची इतर कामे करणेदेखील व्दितीय पक्षास बंधनकारक राहिल.

२९. व्दितीय पक्ष ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेकामी महित्यातुन एक वेळा महिना पुर्ण झाल्यानंतर देयक तयार करुन लेखी देयक महानगरपालिकेला सादर करतील. सदर देयकाची रक्कम महानगरपालिका व्दितीय पक्षीय यांना देऊ करेल असे उभयपक्षीय यांनी मान्य केले. तसेच निविदाधारकाने प्रत्येक महिन्यात कंत्राटी कामगारांना महिन्याच्या १० तारखेच्या आतमध्ये मजुरांचे वेतन अदा करणे व्दितीय पक्षास बंधनकारक राहिल अन्यथा निविदा रद्द करणेबाबत कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेले सर्व कर भरण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

३०. Risk and Cost Clause:- ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम विहीत मुदतीत पूर्ण न झाल्यास प्रती दिन, प्रती मजुर रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर मात्र) याप्रमाणे दंड आकारण्यात येईल, हे व्दितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे. मजुर पुरवठा करण्याचे काम मुदतीत पूर्ण न केल्यास महानगरपालिका इतर कोणत्याही पक्षाकडुन काम करुन ज्यादा होणारा आकार व्दितीय पक्ष यांच्याकडुन वसूल करेल.

३१. या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस क्षति झाल्यास व्दितीय पक्ष क्षतीपूर्ती हमी देत आहेत.

३२. निविदाधारकाने ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम खंडीत केले अथवा निविदा नियम अटीचा भंग केल्यास व्दितीय पक्षीय यांना १५ दिवसांची नोटीस देऊन खुलासा मागविण्यात येईल. सदरचा खुलासा समाधानकारक नसल्यास व्दितीय पक्ष यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन सदर काम रद्द करुन व्दितीय पक्ष यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन सदर काम रद्द करुन सदरची कंपनी काळ्या यादीत टाकणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

सत्यप्रत
उप-मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93.

२६/१०

३३. ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेकामी उभयपक्षीयांमध्ये काही वाद उपस्थित झाल्यास एक सदस्यीय लवाद म्हणुन काम पाहतील त्यांनी दिलेला निर्णय हा उभय पक्षीयांवर बंधनकारक राहील. सदर लवादाचे काम Arbitration and Conciliation Act, १९९६ या कायद्याप्रमाणे होईल. सदर कामासंदर्भात उभय पक्षीयांच्या मध्ये वाद उद्भवल्यास मा. न्यायालय ठाणे जिल्हा कार्यक्षेत्र असेल.

३४. व्दितीय पक्षीय यांच्याकडुन नियमाप्रमाणे आयकर व इतर कर देयकातून कपात करण्यात येईल. निविदाधारकाने प्रदान करावयाच्या करामध्ये वाढ झाल्यास वाढीव रक्कम प्रदान करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३५. Safety requirements: ठेका मजुरांना काम करतेवेळी इजा, अपंगत्व, अपघात अथवा मृत्यु संभवल्यास (Accident, Permanent Disability, Loss of Life etc. ) याची सर्व भरपाईची व इतर कायदेशीर जबाबदारी निविदाधारक यांची राहील.

३६. Financial & legal liability: निविदेतील आणि करारातील अटी व शर्तीमुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

३७. Subcontract: व्दितीय पक्षीयांना ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रेक्टरला देता येणार नाही.

३८. सदर करारनाम्यात उभय पक्षीयांच्या संमतीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

३९. सदर निविदेमधील, करारनाम्यातील, कार्यादेशामधील व ठेका संबंधीत सर्व कागदपत्रातील सर्व मजकुर किंवा मुद्दे उभय पक्षीयांना बंधनकारक राहतील.

४०. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम अन्वये सदर करारनाम्यावर योग्य ते मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीयांची राहील.

४१. व्दितीय पक्षीयांनी नेमुन दिलेल्या प्रत्येक मजुराला कॉन्ट्रेक्टर लेबर ॲक्ट मध्ये नमुद केल्याप्रमाणे ओळखपत्र द्यावयाचे असुन कामाच्या प्रत्येक दिवशी सदर मजूरांनी ओळखपत्र त्यांच्याकडे ठेवण्याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीयांची राहील.

४२. व्दितीय पक्ष यांनी ठेका मजुरांना देण्यात येत असलेले किमान वेतन, त्याची तारीख, कामाची वेळ, ठेका मजुराचे नाव याचा गोषवारा तयार करुन त्याची एक प्रत प्रथम पक्ष यांना द्यावयाची आहे.संबंधीत ठेकामजुरांचा वेतनाचा कालावधी एक महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये.

४३. व्दितीय पक्षीयांना प्रत्येक मजुरास द्यावयाचे किमान वेतन प्रथम पक्ष यांनी नेमुन दिलेल्या कर्मचारी यांच्या समक्ष अदा करावयाचे आहे. सदर वेतन अदा केल्याची नोंद नमुना नोंदवहीत घेवुन जतन करावयाची आहे. त्याच प्रमाणे सदर नोंदवह्या सदैव पाहणीसाठी तयार ठेवायची आहे.

४४. कॉन्ट्रेक्टर लेबर ॲक्ट मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व सुविधा मजुरांना पुरविण्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

४५. व्दितीय पक्ष यांना जनतेकडुन / व्यक्तीकडुन/ संस्थेकडुन त्यांनी केलेल्या कोणत्याही कामाबाबत कोणताही खर्च वसुल करता येणार नाही.

४६. वृक्षप्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी नेमुन दिलेली कामे करीत असताना ठेका मजुरास किंवा इतर कोणाचीही जिवीत व वित्तहानी झाल्यास त्याची जबाबदारी व्दितीय पक्ष यांची राहील.

४७. व्दितीय पक्ष यांनी यांच्या कडुन भरण्यात येणारी सुरक्षा अनामत रक्कम ठेक्याची मुदत संपेपर्यंत व त्यानंतर पुढील तीन महिन्यापर्यंत महानगरपालिकेकडे जमा राहील. सदर सुरक्षा अनामत रक्कम व बयाणा रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

४८. व्दितीय पक्ष यांनी महानगरपालिकेस पुरवठा करणाऱ्या मजूरांचे मासिक वेतन राष्ट्रीय किंवा शेड्युल्ड बँकेत जमा करणे बंधनकारक आहे व त्याचा संपुर्ण तपशिल प्रथम पक्ष यांना देणे बंधनकारक राहील.

सत्यप्रत
उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
मिरा भाईंदर महानगरपालिका

AIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93.

४९. सदर कामी व्दितीय पक्ष यांनी भरलेले (EMD) अधिक सुरक्षा अनामत रक्कम असे एकुण ५% (अक्षरी पाच टक्के) करारनाम्यानुसार काम पुर्ण झाल्यानंतर व्दितीय पक्ष यांनी मुळ पावतीसह लेखी अर्ज केल्यानंतर नियमाप्रमाणे महानगरपालिकेने परत करायचे मान्य केले आहे. त्या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

५०. नैसर्गिक आपत्ती उदा. वारा, वादळ, पाऊस, पुर, विज पडणे, भूकंप, ज्वालामुखी, इ. व तसेच संप, संचारबंदी, इजा, अपघात यामुळे होणाऱ्या वित्तीय व मनुष्यहानीस व्दितीय पक्ष सर्वस्वी जबाबदार राहतील.

५१. सदर कामाचा कालावधी ०१ वर्षाकरीता राहिल. परंतू काही कारणास्तव सदर करारनाम्याचा कालावधी वाढवावा लागल्यास, व्दितीय पक्षीय यांचे काम समाधानकारक असल्याची खात्री झाल्यानंतर करारनाम्याचा कालावधी वाढविण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यांस राहिल सदर वाढीव कालावधीच्या करारनाम्याची मुद्रांक शुल्क भरणेची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहिल.

५२. सदर करारनाम्यासाठी मुद्रांक शुल्क कायद्यानुसार योग्य ती मुद्रांक शुल्क भरण्याची जबाबदारी व्दितीय पक्षीय यांची राहिल.

करारनाम्यातील वरील सर्व अटीशर्ती व निविदेतील सर्व अटीशर्ती प्रथम पक्षीय व व्दितीय पक्षीय यांनी मान्य केल्या असून त्या बंधनकारक आहेत व त्यानुसार स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत.

सदरचा करारनामा आज दिनांक २९/१०/२०२१ रोजी चांगल्या मनःस्थितीत लिहून दिला आहे.

मा. स्थायी समिती सदस्य.

प्रथम पक्षीय

28/10

(संजय शिंदे)
उप आयुक्त (उदयान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

① Sanjay Therade

2 Rakesh Shah
(राकेश शहा)

HIRAVATI ENTERPRISES MUMBAI 93

व्दितीय पक्षीय
(मे. हिरावती एंटरप्रायजेस)
चे प्रोप्रायटर श्री. सुशांत तिर्थराज यादव

१) नाव :- Rahul Yadav
पत्ता :- B/801 RNA Heights, J.V. Link Rd, Andheri (E) Mumbai-93
भ्रमणध्वनी :- 9867336543

२) नाव :- Siddharth
पत्ता :- 8/15 New Shiv Darshan, Andheri (W) Mumbai-61
भ्रमणध्वनी :- 9322056609

सन २०२१/२२ / करारनामा रजिस्टर
अनु. क्र. ३८८ दि. २९/१०/२१ अन्वये
नोंद करण्यात आली.

महापालिका सचिव
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

दूरध्वनी: 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल: mbmcho@gmail.com वेबसाईट: www.mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा

## मुख्य कार्यालय

/मनपा / वृ.प्रा / मिरारोड / कार्यादेश / ८१ / 2022-23

दिनांक: 31/10/2022

O/C

**// कार्यादेश //**

प्रति,
मे. हिरावती इंटरप्रायजेस,
आर.आर. यादव कंपाऊंड, महाकाली रोड,
अंधेरी पुर्व, मुंबई – ४०० ०९३

विषय:- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे.

संदर्भ:- १) मा. विशेष महासभा ठराव क्र. ४८ दि. ३०/०३/२०२१

२) मा. आयुक्त सो. यांची दि. ०५/०५/२०२१ रोजीची मान्यता.

३) दि.०७/०५/२०२१ रोजी दै. ठाणे वैभव व दै. द ग्लोबल टाईम्स व ई-टेंडरींग पद्धतीने जाहीर निविदा प्रसिध्दी.

४) मा. निविदा समिती दि. १७/०८/२०२१ रोजीची मान्यता.

५) मा.आयुक्त सो. यांची दि. ०३/०९/२०२१ रोजीची मंजुरी.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र. ८४ दि. २९/०९/२०२१ रोजीची मंजुरी.

७) मा. आयुक्त सो. यांची दि. १२/१०/२०२१ रोजीची मंजूरी.

८) दि. २९/१०/२०२१ रोजीचा करारनामा.

८) दि. २९/१०/२०२१ रोजीचा वार्षिक कार्यादेश.

९) जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/५३२/२०२१-२२ दि. २९/१०/२०२१ रोजीची मंजुरी.

१०) मा. आयुक्त सो. यांची दि. 31 /१०/२०२२ राजीची मंजुरी.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणेकामी निविदेतील, गोषवाऱ्यामधील व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | प्रभाग समिती क्र. | प्रति दिन मजुर पुरवठा | मंजुर दर |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे. | प्रभाग समिती क्र. १, २ व ३ | ५० प्रति दिन | रु. १,१६०/- प्रति दिन/ प्रति मजुर |
| | | प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ | ७५ प्रति दिन | |
| | | एकुण | १२५ प्रति दिन | |
| | सदर मजुर पुरवठा करण्याचा कालावधी दि. ०१/११/२०२२ ते नवीन निविदा मंजुर होईपर्यंत राहील. | | | |

सत्यप्रत

उप.मुख्य उद्यान अधिकारी
प्रभाग समिती क्र. 4, 5 व 6
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

(संजय शिंदे)
उप. आयुक्त
उद्यान व वृक्ष प्राधिकरण
मिरा भाईंदर महानगरपालिका

"आपली जबाबदारी व अधिकार, मजबूत लोकशाहीचा आधार"

"जागरुक मतदार लोकशाहीचा आधार"

उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

उप.मुख्य उद्यान अधिकारी
प्रभाग समिती क्र. 4, 5 व 6
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**उदयान विभाग**

मा. प्रशासकीय सभा दि.   /   /२०२२

## // गोषवारा //

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणेकामी निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केलेले आहे. रस्त्याच्या दुतर्फा
...ले झाडांच्या फांद्यांची छाटणी हायडोलिक शिडी मार्फत करणे, छाटणी केलेल्या फांद्या ट्रॅक्टरव्दारे उचलूण घेणे.
...च्या दुतर्फा वाढलेले गवत काढणे, नव्याने वृक्षारोपण केलेल्या झाडांना ओळी बनविणे, पाणी देणे व इतर कामे ठेका
...मार्फत करण्यात येतात तसेच पावसाळ्यात आपत्कालीन व्यवस्थापन कालावधीत ३ (तीनही) शिफ्टमध्ये
...मार्फत कामे करावी लागतात.

तसेच यापुर्वी सदर उपरोक्त कामे करण्या करीता मजुर पुरवठा करणेकामी मा. महासभा ठराव क्र. ४८
...३०/०३/२०२१ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यते नुसार व मा. आयुक्त यांच्या दि. ०५/०५/२०२१ रोजीच्या मान्यतेने
...स्थायी समिती सभा ठराव क्र. ८४ दि.२९/०९/२०२१ अन्वये मजुर पुरवठा करणेकामी मे. हिरावती इंटरप्रायजेस यांना
...१,१६०/- प्रति मजुर प्रती दिन दराने वार्षिक काम देऊन दि.२९/१०/२०२१ रोजी करारनामा करुन मे. हिरावती इंटरप्रायजेस
...जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/५३२/२०२१-२२ दि.२९/१०/२०२१ रोजी दर मंजुरीचा वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला
असुन त्यानुसार खालील तक्त्यात नमुद प्रमाणे प्रभाग समिती क्र. १ ते ६ करीता प्रती दिन प्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला
असुन त्यानुसार मजुर पुरवठा करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | प्रभाग समिती क्र. | मंजुर दर | प्रति दिन मजुर पुरवठा |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा करणे. | प्रभाग समिती क्र. १, २ व ३ | रु. १,१६०/- प्रति दिन/ प्रति मजूर | ५० प्रति दिन |
| | | प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६ | | ७५ प्रति दिन |

तथापी सदर वार्षिक कार्यादेशाची मुदत दि.३१/१०/२०२२ पर्यंत असल्याने मा. आयुक्त सो. यांच्या
दि.३१/१०/२०२२ रोजीच्या मान्यतेने ठेकेदार मे. हिरावती इंटरप्रायजेस यांच्या मागील मंजुर दराने नविन निविदा मंजुर
होईपर्यंत मुदतवाढ देवुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात वृक्ष प्राधिकरण अर्थ संकल्पात "मजुर पुरवठा / वृक्षारोपण निगा व देखभाल"
या लेखा शिर्षकाअंतर्गत रु.२००,०० लाख व उद्यान विभाग "मजुर पुरवठा" या लेखाशिर्षका अंतर्गत रु.१०००.०० लाख
अशी एकुण रु.१२००.०० लाख तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी मधुन खर्च करण्यात येणार आहे.

तसेच वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता वार्षिक अंदाजे रु.४.५० कोटी पर्यंत खर्च आवश्यक आहे. परंतु सन
२०२२-२३ च्या वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अंदाजपत्रकामध्ये रु.२.०० कोटीची तरतुद केल्याने सदरची तरतुद अपुरी पडत
आहे. त्यामुळे सन २०२३-२४ करीता नव्याने निविदा मागविणेकामी सन २०२३-२४ चा उद्यान विभागाच्या
अंदाजपत्रकामध्ये तरतुद करुन नव्याने निविदा मागविणे योग्य राहील.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरण विभागाकरीता रोडच्या दुतर्फा वृक्षारोपण
करण्यात आलेल्या झाडांची निगा व देखभाल करणेकामी किमान वेतन कायदा अधिनियम १९४८ अन्वये मजूर पुरवठा
करणेकामी सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये योग्यती तरतुद करुन सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेवुन ई-टेंडरींग
(ऑनलाईन) पध्दतीने निविदा मागविण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मा. प्रशासक यांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता
मिळणेस शिफारस असे.

**(संजय शिंदे)**
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सत्यप्रत
उप मुख्य उद्यान अधिकारी
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
मिरा भाईंदर महानगरपालिका

दूरध्वनी: २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स: २८१९७६३६

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१.

जा. नं. मनपा/वृप्रा/२८८/२०१६-१७ दिनांक : १२/०८/२०१६

## // कार्यादेश //

प्रति,
मे. स्टार कंन्स्ट्रक्शन,
भाईदर शॉपिंग सेंटर,
फाटक रोड, भाईदर (प.)

विषय :- उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग प्रभाग क्र. 5 व 6 करिता ठेका पध्दतीने वाढीव मजुर पुरवठा करणेबाबत.

संदर्भ :1) मा. वृक्ष प्राधिकरण समिती सभा ठराव क्र. 12 दि. 23/05/2013 अन्वये.
2) दि. 24/01/2014 रोजी दै. नवभारत व दै. मिडे या वृत्तपत्रात तसेच **E-Tendering** वेबसाईट **https://mbmc.eproc.in** वर प्रसिध्द केलेली जाहीर फेर निविदा (व्दितीय) सुचना.
3) मा.निविदा समिती यांची दि. 24/02/2014 रोजी निविदा स्विकारणेस शिफारस.
4) मा. आयुक्त सो. यांची दि. 24/02/2014 रोजीची निविदेस मंजूरी.
5) मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 10 दि.30/05/2014 अन्वये मान्यता.
6) आपल्या सोबत केलेला दि. 31/05/2014 रोजीचा करारनामा.
7) मा. महासभा ठराव क्र. 138 दि. 24/02/2016.
8) मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली दि.03/03/2016 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत.
9) मा.आयुक्त सो. यांची दि. 09/03/2016 रोजीची मंजुरी.
10) मा.आयुक्त सो. यांचा जा.क्र./मनपा/वृ.प्रा./700/2015-16 दि. 31/03/2016 रोजीचा सुधारीत कार्यादेश.
11) मा.आयुक्त सो. यांची दि. 12/08/2016 रोजीची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईदर महानगरपालिका प्रभाग क्र. ५ व ६ अंतर्गत येणा-या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात दुभाजकातील जंगली गवत काढणे व इतर साफसफाई करणेकामी ठेका पध्दतीने वाढीव मजुर पुरवठा करणेकामी निविदेतील व करारनाम्यातील अटीशर्तीप्रमाणे आपणास खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजुर दर | मजुर संख्या |
|---|---|---|---|
| 1. | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात ठेका पध्दतीने (मजुर, स्त्री/पुरूष) पुरवठा करणे. | रू. 863/- प्रति दिन, प्रति मजुर | 10 मजुर |

टीप:- सदर मजुर पुरवठा करण्याची मुदत पुढील आदेश होईपर्यंत राहील.

सत्यप्रति
उप मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. 4,5 व 6
मिरा भाईदर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (सा.बां.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

दूरध्वनी : २८१९२८२८ / २८१९३०२८/ २८१८११८३ / २८१८१३५३/२८१४५
फॅक्स : २८१९९

# मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPA CORPORATIC

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०

जा. नं. / मनपा / वृ.प्रा./ 63 / 2014-15    01    दिनांक : 31/05/14

## // वार्षीक कार्यादेश //

प्रति,
मे. स्टार कंन्ट्रक्शन
भाईंदर शॉपींग सेंटर,
फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता किमान वेतन कायद्याप्रमाणे ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेबाबत.

संदर्भ :- 1) मा. वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र. 12 दि. 23/05/2013 अन्वये.
2) दि. 24/01/2014 रोजी दै. नवभारत व दै. मिडे या वृत्तपत्रात व ई-टेंडरींग वेबसाईट https://mbmc.eproc.in वर प्रसिध्द केलेली जाहीर फेर निविदा (व्दितीय)सूचना.
3) मा. निविदा समिती यांची दि. 24/02/2014 रोजी निविदा स्विकारणेस शिफारस.
4) मा. आयुक्त सो. यांची दि. 24/02/2014 रोजीची निविदेस मंजुरी.
5) मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 10 दि.30/05/2014 अन्वये निविदेस मान्यता.
6) आपल्या सोबत केलेला दि.31/05/2014 रोजीचा करारनामा.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग प्रभाग क्र. 1,2,3, व 4,5,6 अंतर्गत येणा-या उद्याने, मैदाने, चौपाट्या, स्मशाने, नर्सरी, दुभाजक व विविध कामाकरिता ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करण्यास निविदेतील व करारनाम्याच्या अटीशर्तीच्या अधिन राहून कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मजुर पुरवठा करण्याचा कालावधी | मंजुर दर (रु.) | ठेका मजुर संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात ठेका पध्दतीने मजुर (स्त्री/पुरुष) पुरवठा करणे. | 1 जून 2014 ते 30 जून 2014 | रु. 409.50 प्रती दिन/प्रती मजुर | प्रभाग क्र. 1, 2 व 3 105 ठेका मजुर व प्रभाग क्र. 4, 5 व 6 105 ठेका मजुर |
| | | 1 जुलै 2014 ते 31 डिसेंबर 2014 | रु. 423/- प्रती दिन/प्रती मजुर | |
| | | 1 जानेवारी 2015 ते 30 जुन 2015 | रु. 423/- प्रती दिन/प्रती मजुर + सदर कालावधीमध्ये किमान वेतन कायद्याप्रमाणे देय असणारी फरकाची रक्कम. | |

1) सदर कामी महानगरपालिकेच्या उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागास दररोज 210 ठेका मजुर पुरवठा आवश्यकतेनुसार (कमी/जास्त) करावा.

P.T.O

M/s. STAR CONSTRUCTION

सत्यप्रत
प्रभाग समिती क्र. 4, 5 व 6
मिरा भाईदर महानगरपालिका

2) सदर ठेका मजुरांच्या कामाची वेळ प्रथम पाळी (I$^{st}$ Shift) सकाळी 7.30 ते दुपारी 3.30, दुसरी पाळी (II$^{nd}$ Shift) दुपारी 3.30 ते रात्री 11.30 व तिसरी पाळी (III$^{rd}$ Shift) रात्री 11.30 ते सकाळी 7.30 असणार आहे. तिनही पाळीमध्ये ठेका मजुर (स्त्री/पुरुष) पुरवठा करणे बंधनकारक आहे.

3) सदर ठेका मजुरांचे दैनंदिन हजेरीपत्रक उद्यान अधिक्षकांकडून तपासून घेण्यात यावे.

4) किमान वेतन कायद्याप्रमाणे ठेका मजुरांना आठवड्यातून एक दिवस सुट्टी देणे बंधनकारक असेल. सदर सुट्टीच्या दिवशी बदली ठेका मजुर पुरवठा करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल स्पष्ट नोंद घ्यावी.

5) सदर कामाची मुदत दि.01/06/2014 पासुन दि.31/05/2015 पर्यंत राहिल.

6) महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी कमी/अधिक प्रमाणात ठेका मजुर पुरवठा करणे बंधनकारक राहिल.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने

उप-आयुक्त तथा वृक्षअधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत

उप.मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. 4, 5 व 6
मिरा भाईंदर महानगरपालिका

दूरध्वनी: २८१९२८२८ / २८१९३०२८ / २८१८११८३ / २८१८१३५३ / २८१४५९८५
फॅक्स: २८१९९७६३६

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईंदर

# MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

स्व.इंदिरागांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प), ता.जि.ठाणे-४०११०१

दिनांक : ३१/३/२०१६

जा. क्र. मनपा/वृ.प्रा/७००/२०१५-१६

## // सुधारीत कार्यादेश //

प्रति,
मे. स्टार कंन्ट्रक्शन
भाईंदर शॉपिंग सेंटर,
फाटक रोड, भाईंदर (प.)

विषय :- उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागाकरिता ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करणेबाबत.

संदर्भ :- 1) मा. वृक्षप्राधिकरण समिती सभा ठराव क्र. 12 दि. 23/05/2013 अन्वये.
2) दि. 24/01/2014 रोजी दै. नवभारत व दै. मिडे या वृत्तपत्रात व ई-टेंडरीग वेबसाईट https://mbmc.eproc.in वर प्रसिध्द केलेली जाहीर फेर निविदा (व्दितीय)सूचना.
3) मा. निविदा समिती यांची दि. 24/02/2014 रोजी निविदा स्विकारणेस शिफारस.
4) मा. आयुक्त सो. यांची दि. 24/02/2014 रोजीची निविदेस मंजुरी.
5) मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 10 दि.30/05/2014 अन्वये निविदेस मान्यता.
6) आपल्या सोबत केलेला दि.31/05/2014 रोजीचा करारनामा.
7) उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र.किवेअ-2014/510/प्र.क्र.150/कामगार-7, दि.24/02/2015 रोजीची अधिसुचना
8) मा.महासभा ठराव क्र.138 दि.24/02/2016
9) मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली दि.03/03/2016 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तांत.
10) मा.आयुक्त सो.,यांची दि. 09/03/2016 रोजीची मंजुरी.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर महानगरपालिका उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग प्रभाग क्र. 1,2,3, 4,5 व 6 अंतर्गत येणा-या उद्याने, मैदाने, चौपाट्या, स्मशाने, नर्सरी, दुभाजक व विविध कामाकरिता ठेका पध्दतीने मजुर पुरवठा करण्यास निविदेतील व करारनाम्यातील अटीशर्तीप्रमाणे कार्यादेश देण्यात आला होता. तथापी शासन निर्णय संदर्भ क्र. 7 अन्वये कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन मिळण्याच्या दृष्टीकोणातुन आपणास खालीलप्रमाणे सुधारित कार्यादेश देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | मंजुर दर | संख्या |
|---|---|---|---|
| 1. | उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात ठेका पध्दतीने (मजुर, स्त्री/पुरुष) पुरवठा करणे. | रु. 863/- प्रती दिन, प्रती मजुर | 90 प्रभाग क्र. 1,2 व 3<br>90 प्रभाग क्र. 4,5 व 6 |

टिप:- सदर मजुर पुरवठा करण्याची मुदत 01 एप्रिल 2016 पासून पुढील आदेश होईपर्यंत राहील.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्यप्रत

उप.मुख्य उद्यान अधिक्षक
प्रभाग समिती क्र. 4,5 व 6
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ २८ /२०२३-२४ दिनांक : १४/०८/२३

माहितीचा अधिकार

प्रति,
श्री.राजेश महादेव जाधव
डी १७,शांती शॉपिंग सेंटर
मिरा रोड रेल्वे स्टेशन समोर
मिरा रोड (पु)

विषय :- केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये,
वृक्षरोपण निगा व देखभाल करण्यासाठी मजुर पुरवठा बाबत माहिती.
संदर्भ :- आपला दि.०५/०६/२०२३ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

केंद्र शासन माहीती अधिकार २००५ अन्वये मिरारोड(पु.) वृक्षरोपण निगा व देखभाल करण्यासाठी मजुर पुरवठा बाबत सन २०१५ ते आज रोजी पर्यंतची माहिती, माहितीअधिकार अर्जात आपण अपेक्षलेली आहे..

त्या अनुषंगाने आपण मागणी केलेल्या माहितीचे अभिलेख तपासले असता सदर माहिती कागद पत्राच्या एकूण ६० प्रति होत असून प्रति प्रत रु. २/- याप्रमाणे रु. १२०/- चा भरणा केल्यानंतरच आपणास सदरची माहिती देण्यात येईल.

तरी मनपा फंडात रक्कम रु.१२०/- भरुन माहिती संकलित करुन घेण्यात यावी.

(नागेश विरकर)
जन माहिती अधिकारी तथा
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान विभाग
दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ २८ /२०२३-२४ दिनांक : ९८ / ६/२०२३

माहितीचा अधिकार

प्रति,
श्री.राजेश महादेव जाधव
डी १७,शांती शॉपिंग सेंटर
मिरा रोड रेल्वे स्टेशन समोर
मिरा रोड (पु)

विषय :- केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये,
वृक्षरोपण निगा व देखभाल करण्यासाठी मजुर पुरवठा बाबत माहिती.
संदर्भ :- आपला दि.०५/०६/२०२३ रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

केंद्र शासन माहीती अधिकार २००५ अन्वये मिरारोड(पु.) वृक्षरोपण निगा व देखभाल करण्यासाठी मजुर पुरवठा बाबत सन २०१५ ते आज रोजी पर्यंतची माहिती, माहितीअधिकार अर्जात आपण अपेक्षलेली आहे..

त्या अनुषंगाने आपण मागणी केलेल्या माहितीचे अभिलेख तपासले असता सदर माहिती कागद पत्राच्या एकूण ६० प्रति होत असून प्रति प्रत रु. २/- याप्रमाणे रु. १२०/- चा भरणा केल्यानंतरच आपणास सदरची माहिती देण्यात येईल.

तरी मनपा फंडात रक्कम रु.१२०/- भरुन माहिती संकलित करुन घेण्यात यावी.

(नागेश विरकर)
जन माहिती अधिकारी तथा
उप.मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

### शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे (नियम 3 कलम 19 अ) अन्वेय अर्ज

**मा. जन माहिती अधिकारी**

**उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग**

**(प्रभाग समिती क्र. ४ ते ६ )**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**भाईंदर (प.)**




| | | |
|---|---|---|
| 1) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | राजेश महादेव जाधव<br>भ्रमणध्वनी क्र. ९३२३२७६६९३<br>इमेल : missionjankalyan81@gmail.com |
| 2) | अर्जदाराचा संपूर्ण पत्ता | डी-17, शांती शॉपिंग सेंटर, मिरा रोड रेल्वे स्टेशन समोर, मिरा रोड पूर्व, जि. ठाणे – 401 107 |
| 3) | माहितीचा विषय | वृक्षारोपण निगा व देखभाल करण्यासाठी मजूर पुरवठा बाबत माहिती मिळावी |
| 4) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील<br>[illegible]<br>[illegible]<br>[illegible] | १) वृक्षारोपण निगा व देखभाल करण्यासाठी मजूर पुरवठा बाबत झालेल्या एकूण खर्चाचा संपूर्ण तपशील मिळावा. 2) वृक्षारोपण निगा व देखभाल करण्यासाठी मजूर पुरवठा करण्यासाठी नेमण्यात आलेल्या ठेकेदाराचा कार्यादेश मिळावा. 3) पु वृक्षारोपण निगा व देखभाल करण्यासाठी मजूर पुरवठा करण्यासाठी नेमण्यात आलेल्या ठेकेदारासोबत केलेला करारनामा व ठेकेदाराला अदा करण्यात आलेल्या बिलांची अहवालासहित संपूर्ण माहिती मिळावी. |
| | १) माहिती ज्याच्याशी संबधित असेल तो कालावधी | सन 2015 पासून ते आज रोजीपर्यंत |
| | २) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | वरील प्रमाणे |
| | ३) माहिती टपालाद्वारे किंवा आवश्यक आहे किंवा नाही कसे ? | व्यक्तिश: |
| | ४) टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने ? | निरंक |
| 5) | अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किवा कसे ? | नाही |

**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१७ / प्र. क्र. (२०८/१७) सहा. यानुसार माहिती देण्यात यावी.**

देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या साक्षांकित व सत्यप्रती सही शिक्यानिशी दयाव्यात.

ठिकाण :- मिरा रोड

दिनांक 05/06/2023

अर्जदाराची सही

(राजेश म. जाधव)

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. 22 दि. 05/06/2023
2023-24
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपालखर्चासह कळविण्याबाबत आणि माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा आढावा घेऊन त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१७ /प्र.क्र.(२०८/१७) सहा.

मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.

दिनांक- १७.११.२०१७.

परिपत्रक:-

माहिती अधिकारात अर्जदाराला वेळेवर माहिती मिळण्यासाठी, जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास जलदगती टपालाने टपालखर्चासह तपशीलवार कळविण्याबाबत एक परिपत्रक निर्गमित करण्याचे निर्देश व्दितीय अपील क्र.केआर ५०४१/२०१६ मध्ये दि.९.८.२०१७ रोजी मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दिले आहेत आणि अन्य व्दितीय अपील क्र.केआर ५१८४/२०१६ मध्ये १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम जलदगती टपालाने अर्जदारास टपालखर्चासह कळविण्यासह शासन कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी आवश्यक आर्थिक तरतूद तीन महिन्यात करण्याचे निर्देश मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण यांनी दि.११.८.२०१७ रोजी दिले आहेत. मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांच्या सदर निर्देशानुषंगाने सर्व विभागांना सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुसार शासन पुढीलप्रमाणे सुचित करीत आहे.

२. "जन माहिती अधिकाऱ्याने, माहिती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, १० व्या दिवसापर्यंत माहितीच्या शुल्काची रक्कम अर्जदारास टपाल पृष्ठसंख्या व टपालखर्चासह, जलदगती टपालाने तपशीलवार कळवावी. तसेच सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यालयातील माहिती अधिकाराशी संबंधीत पत्रव्यवहाराचा तपशीलवार आढावा घेऊन माहिती अधिकार अधिनियमांतर्गत होणाऱ्या पत्रव्यवहारासाठी दरवर्षी आवश्यक आर्थिक तरतूद करावी ".

३. उपरोक्त परिपत्रकातील तरतूदी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरण तसेच सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व तदनुसार आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात यावे.